## Pimpri Chinchwad Police Commissionerate

**प्रेस नोट ता. १७/०३/२०२०**

**गुन्हे शाखा, युनिट-४, पिंपरी-चिंचवडची धडाकेबाज कारवाई**

**दहशत माजविण्यासाठी पुणे शहर व पिंपरी चिंचवड परिसरात विक्री साठी आणलेल्या एकुण ६ पिस्टल, व १५ जिवंत काडतुसे असा अग्निशस्त्राचा साठा जप्त**

मा.पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड यांनी पिंपरी चिंचवड शहरात अवैद्ध रित्या घातक शस्त्रे जवळ बाळगणारे इसमांबाबत माहिती घेवुन त्यांचा शोध घेवुन त्यांचेविरुध्द कडक कारवाई करणे बाबत आदेश दिल्याने दि. ०६/०३/२०२० रोजी गुन्हे शाखा युनिट-४, चे सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख व पोलीस पथक वाकड पोलीस स्टेशन हद्दीत मा.वपोनि.श्री.मोहन शिंदे सो यांचे आदेशाने रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक करण्यासाठी फिरत असताना दुपारी १६.०० वा.चे सुमारास **पोलीस नाईक लक्ष्मण आढारी** यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, एक इसम काळेवाडी येथील लकी बेकरी समोर संशयीतरित्या थांबला असुन त्याने अंगात काळे रंगाचे जर्कीन व निळे रंगाची पँट घातलेली असुन त्याचेकडे पिस्तोल आहे. वगैरे बातमी मिळताच त्याबाबत त्यांनी सपोनि देशमुख सो यांना कळविले असता त्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मोहन शिंदे सो यांना माहिती कळविली, त्यांनी सदर ठिकाणी जावुन खात्री करुन कायदेशीर कारवाई करणेबाबत आदेश दिल्याने, त्यांनी दिलेल्या मार्गदर्शनाखाली व योग्य सुचना प्रमाणे सपोनि अंबरिष देशमुख यांनी स्टाफसह काळेवाडी पुलाजवळील लकी बेकरी जवळ जावुन स्टाफचे मदतीने सापळा लावुन सदर इसमास शिताफीने पकडले. त्याची जागीच अंगझडती घेतली असता त्याचे कमरेचे डावे बाजुस एक देशी बनावटीचे पिस्तोल खोचलेले मिळुन आले. पिस्तोलची पाहणी करता त्यामध्ये ०२ जिवंत काडतुसे तसेच एक पिस्तोल सारखे दिसनारे लायटर असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर इसमाचे नाव **गणेश मारुती माळी वय.२६ वर्षे,रा. बाबुराव ढोरे भवन,फ्लॅट नंबर १९, महादेव मंदिराजवळ,जुनी सांगवी पुणे** असे असल्याचे समजले. त्याचेवरूध्द वाकड पो. स्टेशन येथे त्याचे विरूध्द गु.रजि.नं. २०१/२०२० शस्त्र अधिनियम कलम ३,५ (२५)(२७) तसेच सह कलम महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) सह १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येवुन त्याचेकडे जप्त पिस्टल कोठुन आणले याबाबत तपास करता त्याने सदरचे पिस्टल इसम नामे **ग्यानोबा उर्फ गोटु मारुती गित्ते वय.३० वर्षे रा.बँक कॉलनी,परळी जि. बीड मुळगाव नंदागौळ, पो.परळी, जि.बीड** याचेकडुन विकत आणल्याचे सांगीतल्याने त्याचा शोध घेतला असता तो परळी वैजनाथ जि.बिड येथे मिळुन आला. सदर इसमाची माहिती काढली असता तो पिंपरी चिंचवड,पुणे शहर व बीड जिल्हयातील रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असुन त्याचेविरुध्द पुर्वी **खुन,दरोडा,खंडनी, जबरी चोरी,वाहन चोरी अशाप्रकारचे एकुण २३ गंभीर** स्वरुपाचे गुन्हे दाखल असल्याचे अढळुन आले. त्यास नमुद गुन्हयात अटक करुन त्यांचेकडे कसुन तपास केला असता त्याने इसम नामे कालु सिंग जसवंत सिंग रा. ग्राम सिंघाणा ता. मनावर जि. धार (मध्यप्रदेश) याचेकडुन एकुण ०५ देशी पिस्टल,एकुण १५ जिवंत काडतुसे व एक गावठी कट्टा विकत घेतल्याचे व त्यातील ०२ पिस्टल आरोपी क्र. १ यास विक्री केल्याचे व इतर पिस्टल त्याने विक्री साठी लपवुन ठेवल्याचे निष्पन्न झाले. सदर दोन्ही आरोपीतांच्या ताब्यातुन **एकुण ६ देशी बनावटीची पिस्टल, व १५ जिवंत काडतुसे व एक पिस्टल सारखे दिसनारे लायटर असा** एकुण किं.रु. १,६४,१००/-चा माल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपी क्र. १ गणेश मारुती माळी हा हुंदाई शोरुम वाकड पुणे येथे बांउंसरचे काम करीत आहे तर आरोपी क्र. २ ग्यानोबा उर्फ गोटु मारुती गित्ते हा मातोश्री फायनान्स परळी वैजनाथ जि.बिड येथे वसुलीचे काम करीत आहे.शस्त्रे पुरवणारा इसम नामे कालु सिंग जसवंत सिंग रा. ग्राम सिंघाणा ता. मनावर जि. धार (मध्यप्रदेश) हा फरार असुन त्याचा शोध सुरू आहे. पिंपरी चिंचवड आयुक्तालयाच्या स्थापने नंतर अग्निशस्त्रासंदर्भात प्रथमच एवढी मोठी कारवाई करण्यात आली आहे. सदर

गुन्हयाचा तपास श्री अंबरिष देशमुख,सहायक पोलीस निरीक्षक,गुन्हे शाखा, युनिट- ४,पिंपरी चिंचवड हे करीत आहेत.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. संदीप बिष्णोई, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे मा. श्री सुधीर हिरेमठ, सहा.पोलीस आयुक्त मा. श्री. श्रीधर जाधव, गुन्हे-२ यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४ चे पोलीस निरीक्षक मोहन दा. शिंदे, सहा.पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, स.पो.फौ. वासुदेव मुंडे, अदिनाथ मिसाळ, पो.हवा., संजय गवारे, नारायण जाधव, प्रविण दळे, धर्मराज आवटे, दादाभाऊ पवार, शावरसिध्द पांढरे, पो. ना. लक्ष्मण आढारी, मो. गौस नदाफ, तुषार शेटे, पो. शि. सुनिल गुट्टे, प्रशांत सैद, तुषार काळे, सुरेश जायभाये, गोंविद चव्हाण, अजिनाथ ओंबासे, धनाजी शिंदे, सुखदेव गावंडे, व नागेश माळी तांत्रिक विश्लेषन विभाग गुन्हे शाखा यांनी केली आहे.

**( मोहन दा.शिंदे )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा,युनिट-४,पिंपरी चिंचवड

